माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

# माधवप्रिया
## आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

डॉ. संतोष रावसाहेब देशमुख
एम. डी. आयुर्वेद, मुंबई

## सर्दी साठी पथ्य

**नाष्टा:** (खालीलपैकी नाष्ट्याला एक पदार्थ खावा)

- **दुग्धाहार** - गाईचे दूध सुंठ/ आले/वेलची/हळद सिद्ध घ्यावे. आल्याचा चहा अर्धा अर्धा कप घेऊ शकता.
- **फलाहार** - डाळिंब, अंजीर, काळ्या मनुका खाव्यात.आंबट फळे टाळावीत. कफकारक फळे जसे केळी चिकू पेरु, सीताफळ टाळावीत. फळे वैद्यकीय सल्ल्याने खावी.
- **यूष/सूप** - मूग,कुळीथ यांचे सुंठ,धने जिरे व तुपाची फोडणी दिलेले सूप किंवा खालील वर्णित फळभाज्या पालेभाज्या यांचे सूप किंवा भाजून घेतलेल्या भाताची पेज घेऊ शकता.
- **लघ्वाहार** - रव्याचा उपमा/भाजके पोहे.

**जेवण :** (हलका, स्निग्ध उष्ण आहार घ्यावा.)

- **फळभा**ज्या-सर्व  चालेल(बटाटा, टोमॅटो, भरिताचे वांगे, गवार सोडून)द्यावे.
- **पालेभा**ज्या-शेवगा, तांदुळजा, कोथिंबीर घेऊ शकता,
- **धा**न्य-गव्हाचे फु लके ,सातू ज्वारी नाचणी यांची भाकरी जुनी तांबडी साळ घेऊ शकता.
- **भात-**भाजून घेतलेल्या तांदळाची जुन्या तांदळाचा भात मुगाची खिचडी घेऊ शकता.
- **कढण/सूप-** कु ळीथा चे मुगाचे सूप घ्यावे.
- **मांसाहार**-कोंबडी, बोकड, बोकडीच्या पायाचे सूप घेऊ शकता. सवर् र्प्रकारचे मासे टाळावेत.
- **जल -** उष्णोदक, तुळशीची पाने, सुंठ, ओली हळद सिद्ध पाणी घ्यावे. थंड व शिळे पाणी टाळावे.

**विहार –**

- निवा-या च्या खोलीत बसावे. डोक्याला मोठे, लोकरीचे वस्त्र गुंडाळावे.
- जास्त हवेच्या झोतामध्ये बसने किंवा निजने टाळावे.थंड पाणी पिणे, थंड पाण्याने आंघोळ
- करणे,अतिचिंता, दिवसा झोपणे टाळावे.

**विशिष्ट पथ्य :**

- वाफ घेणे, तेलाने मालिश करणे, शेक घेणे, गुळण्या करणे (मीठ व हळदीच्या पाण्याने)
- शिळे, आंबट, थंड पदार्थ टाळावेत.
- रुक्ष पदार्थ (ब्रेड, पाव इ), चण्याचे पदार्थ, दही टाळावेत.


अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

| क्र. | माधवप्रिया शाखा | संपर्क | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - प्रमुख शाखा | 7045607187 | |
| २ | कांदिवली | 7304751357 | |
| ३ | गिरगाव | 022-22081081 | |
| ४ | पुणे - तिसरा रविवार | 8169507436 | |
| ५ | कोल्हापूर - पहिला रविवार | 7045607187 | |